**प्रेस नोट ता. १६/०७/२०२३ पोलीस स्टेशन - वाकड**

## रात्रीचे वेळी दरोडा घालणेचे तयारीत असलेली टोळी जेरबंद, आरोपींकडुन घातक शस्त्रे जप्त वाकड पोलीस स्टेशन तपास पथकाची कामगिरी.

— oo —

पिंपरी चिंचवड परीसरात होणा-या रात्रीचे वेळी जबरी चो-यां मध्ये मोठया प्रमाणावर वाढ झालेने **मा. श्री. विनयकुमार चौबे सो, पोलीस आयुक्त,पिंपरी चिंचवड** यांनी सर्व पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी यांना जबरी चोरीचे गुन्हयांना प्रतिबंध व जबरी चोरीचे गुन्हे उघड करणेबाबत आदेश दिले आहेत.

त्या अनुषंगाने मा.श्री.गणेश जवादवाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक वाकड पोलीस ठाणे यांनी त्यांचे अधिनस्थ असलेल्या तपास पथकातील सपोनि संतोष पाटील, पोउपनि.सचिन चव्हाण व तपास पथक अंमलदार यांची वेगवेगळी पथके तयार करून गुन्हे घडणारी वेळ व रस्ते यावर प्रतिबंधात्मक पेट्रोलींग करत गुन्हयांना आळा घालणे व आरोपींना पकडुन गुन्हे उघड करणेबाबत सुचना दिल्या.

त्याप्रमाणे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार तांत्रीक व पारंपारीक पध्दतीने तपास सुरु केले. तपास पथकातील पोशि. विनायक घारगे, पोशि.स्वप्निल लोखंडे असे रात्रगस्त पेट्रोलींग करीत असताना त्यांना बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, जगताप डेअरी जवळ सांगवीकडे जाणारे सर्व्हिसरोडचे कडेला अंधारात काही इसम संशयीतरित्या उभे आहेत अशी बातमी मिळालेने त्यांनी तात्काळ रात्रगस्त अधिकारी पोउपनि.निबांळकर यांना कळवुन त्यांना बोलावुन घेतले. पोउपनि.निबांळकर यांनी काळेवाडी मार्शलचे पोशि.व्हरकटे, पोशि.कदम तसेच रहाटणी मार्शलचे पोशि.जाधव, होमगार्ड घुगे यांना बोलावुन घेवुन सर्वजण मिळाले बातमीचे ठिकाणी जावुन पाहणी केली असता तेथे अंधारात काही इसम संशयीतरीत्या थांबलेले दिसले. त्यांना आमची चाहुल लागताच ते पळुन जाण्याचा प्रयत्न करीत असताना त्यांना लागलीच बळाचा वापर करुन ताब्यात घेतले परंतु एक इसम अंधाराचा फायदा घेवुन पळुन गेला. ताब्यात घेतलेले इसमांना नाव पत्ता विचारला असता त्यांनी आपली नावे **१) वेंकटेश सुरेश नाईक वय २४ वर्षे रा.राजवाडेनगर, जयहिंदकॉलनी, काळेवाडी पुणे २) चेतन काकासाहेब वाघमारे वय २३ वर्षे रा.ओंकार कॉलनी, नढेनगर, काळेवाडी पुणे ३) शेखर काळुराम जांबुरे वय १९ वर्षे रा.भारत कॉलनी नढेनगर काळेवाडी पुणे व एक विधीसंघर्षग्रस्त बालक** असे सांगितले. तसेच ते **रात्रीचे वेळी रस्त्याने जाणारे इसमांना लुटत असतात** असे सांगितले. सदर रस्त्याने आय.टी.कंपनीत काम करणारे नोकरदार मोटार सायकल वरून एकटे प्रवास करतात त्यांना अडवुन त्यांचेकडिल मोल्यवान वस्तु आरोपी काढुन घेण्याचे तयारीत असतांना मिळुन आले आहेत. पकडलेले ०४ जणांची अंगझडती घेतली असता त्यांचेकडे ०१ तलवार, ०२ धारदार कोयते, मिरची पुड असे सापडले आहे. आरोपींविरुध्द गु.रजि.नं.६६६/२०२३ भादविक ३९९, आर्म अॅक्ट ४,२५, महा.पो.का.क.३७(१)(३)सह १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वेंकटेश सुरेश नाईक वय २४ वर्षे रा.राजवाडेनगर, जयहिंदकॉलनी, काळेवाडी पुणे हा सराईत गुन्हेगार असुन वाकड पोलीस स्टेशन मध्ये गुन्हे दाखल आहेत. पाहिजे आरोपी याचा शोध सुरू आहे. आरोपी यांनी जबरी चोरीचे गुन्हे केले आहेत अगर कसे या अनुषंगाने तपास सुरू असुन आरोपींची दि.१७/०७/२०२३ रोजी पर्यत पोलीस कस्टडी रिंमाड प्राप्त झाली आहे.

सदरची कारवाई मा. श्री. विनयकुमार चौबे सो, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा.श्री.डॉ.संजय शिंदे सो, सह.पोलीस आयुक्त, मा.श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त, मा. श्री. डॉ.काकासाहेब डोळे सो, पोलीस उप आयुक्त,परि-२, पिंपरी चिंचवड, मा. श्री.डॉ. विशाल हिरे, सहा.पोलीस आयुक्त सो, वाकड विभाग, पिंपरी चिंचवड यांचे मार्गदर्शनाखाली मा.श्री. गणेश जवादवाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मा.श्री.रामचंद्र घाडगे पोलीस निरीक्षक (गुन्हे), सपोनि.संतोष पाटील, पोउपनि.निबांळकर, पोउपनि. चव्हाण, पोशि.स्वप्निल लोखंडे, पोशि.विनायक घारगे, पोशि.२३६९ व्हरकटे, पोशि.२५५७ कदम, पोशि.३१५९ जाधव, होमगार्ड के.सी.घुगे यांनी मिळुन केली आहे.

**(डॉ.काकासाहेब डोळे)**
पोलीस उप आयुक्त,
परिमंडळ-२, पिंपरी चिंचवड